# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष २०२४-२०२५ चे मूळ आणि २०२३-२०२४ चे सुधारित अंदाजपत्रक मा. आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आले सादर**
- **पर्यावरण पुरक, शिक्षण, आरोग्य व पाणीपुरवठा सक्षम करणारा अर्थसंकल्प - मा. आयुक्त**

दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते मिरा भाईंदर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष २०२४-२०२५ चे मूळ आणि २०२३-२०२४ चे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आले. प्रसंगी अति. आयुक्त अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त रवि पवार, उपायुक्त कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, मुख्यलेखाधिकारी व वित्त अधिकारी कालिदास जाधव, मुख्यलेखापरीक्षक सुधीर नाकाडी, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे, कार्यकारी अभियंता शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, नगरसचिव वासुदेव शिरवळकर, परिवहन प्रशासकीय अधिकारी दिनेश कानगुडे, माहिती व जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत, लेखा अधिकारी उत्तम तारमळे, आस्थापना विभाग अधिकारी सुनील यादव ,महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

यंदाचे सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक रू. २२९७ कोटी ९४ लाखाचे आहे. सन २०२४-२०२५ च्या मूळ अर्थसंकल्पात आरोग्य विभाग व शिक्षण विभागास प्राधान्य, महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, खर्चामध्ये वित्तीय शिस्त, अनावश्यक महसुली खर्चात कपात, स्वच्छता, आरोग्य व  शिक्षण या त्रिसूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी, भांडवली कामांतर्गत हाती घेतलेली कामे पूर्ण करण्याचे नियोजन, प्रशासकीय कामकाजामध्ये सुधारणा, प्राप्त अनुदानातील कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन, कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष, शासन अनुदानपोटी द्यावयाचा मनपा हिस्सा प्रस्तावित, अमृत २.० अंतर्गत पाणी पुरवठा व भुयारी गटार योजना टप्पा २ योजना पूर्णत्वास नेण्याकडे कल ही प्रमुख वैशिष्ट्ये नमूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर पर्यावरणपूरक, आरोग्यदायी, घनकचरा प्रकल्प व शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी व कंत्राटी कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन मिळावे यासाठी यंदाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे.